# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 29/ 06/2022**

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/०६/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३३ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १,६६,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/०६/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०७ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्याविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक २८/०६/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत शहर येथे ०१ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ४.३२ लिटर दारू असा एकुण १,४४०/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**(COPTA) सिगारेट आणि अन्य तंबाखुजन्य उत्पादने जाहिरात प्रतिबंध अन्य व्यापार वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनीमय कायदा :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २८/०६/२०२२ रोजी (COPTA) सिगारेट आणि अन्य तंबाखुजन्य उत्पादने जाहिरात प्रतिबंध अन्य व्यापार वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनीयमन कायदा अन्वये एकुण ०२ ठिकाणी आरोपींताविरूध्द कार्यवाही करण्यात आली.

**जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.